**राज्यातील नोंदणीकृत गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या स्वयंपुनर्विकासाला चालना देण्याच्यादृष्टीने द्यावयाच्या सवलतीबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**गृहनिर्माण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१०/दुवपु-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १०.०६.२०१९.

**वाचा :-** शासन निर्णय, समक्रमांकः,दि.०८ मार्च,२०१९.

**प्रस्तावना :**

राज्यातील शासकीय/निमशासकीय/खाजगी जमिनींवरील सर्व नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या इमारतींचा स्वयंपुनर्विकास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनातून शासनास प्राप्त झालेल्या विविध सूचनांवर विचार करुन राज्य मंत्रिमंडळाच्या दि.०८/०३/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत काही सवलती प्रदान करण्यास/कार्यवाही करण्यास राज्य मंत्रिमंडळाने तत्वत: मान्यता प्रदान केली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या सदर निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने व द्यावयाच्या विविध सवलतींचे प्रमाण व स्वरुप कसे असावे याबाबत शासनास शिफारशी करण्यासाठी संदर्भाधिन दि.०८/०३/२०१९ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर समितीवर तज्ञ सदस्याची नियुक्ती करण्याची बाब बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासास चालना देण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने तत्वत: मान्यता दिलेल्या उपरोक्त निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने विविध सवलतींचे प्रमाण व स्वरुप कसे असावे याबाबत शासनास शिफारशी करण्यासाठी संदर्भाधिन दि.०८/०३/२०१९ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या उच्च स्तरीय समितीवर मा.आ.श्री.प्रविण दरेकर, विधान परिषद सदस्य यांची “तज्ञ व्यक्ती” म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

२.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१०१५४०५६४००९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrinivas Bhagvanrao Mokalikar

Digitally signed by Shrinivas Bhagvanrao Mokalikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=492dca985d041dcc3804f67582578431e1b5a3dd1c3ba9b38445312a2bad3125, serialNumber=bf17c01112182cb5128db70095d8dc01f8f916c9bc6dace1d8fd8bef272e1f37, cn=Shrinivas Bhagvanrao Mokalikar
Date: 2019.06.10 15:45:09 +05'30'

**( श्रीनिवास मोकलीकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव,
४. मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव,
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
६. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. प्रधान सचिव (सहकार), सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. मा.आ.श्री.प्रविण दरेकर, विधान परिषद सदस्य,
१३. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई,
१५. सर्व विभागीय आयुक्त,
१६. सर्व आयुक्त, महानगरपालिका,
१७. सर्व जिल्हाधिकारी,
१८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१९. सर्व मुख्य अधिकारी, नगर पालिका/नगर परिषद,
२०. सर्व उप सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२१. सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२२. निवड नस्ती.
२३. कार्यासन-दुवपु-१, संग्रहार्थ.